# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 15 August 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १५ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.**

****

देशाचा ७८ वा स्वातंत्र्यदिन सर्वत्र उत्साहात साजरा होत आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुण्यात विधान भवन इथं ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची उपस्थिती होती. मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मंत्रालयात ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी केलेल्या भाषणात मुख्यमंत्र्यांनी समाजाचा सर्वसमावेश विकास म्हणजे स्वातंत्र्य, असं प्रतिपादन केलं. विकसित भारतासाठी विकसित महाराष्ट्र घडवण्याच्या प्रयत्नाबाबत बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले –

***विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी आपल्याला तशी धोरणं आखावी लागतील. या दोन वर्षांपासून अनेक महत्वकांक्षी पावलं टाकलेली आहेत. राज्याची अर्थव्यवस्था पुन्हा पुर्वपदावर आणण्यासाठीचं मोठं आव्हान आपल्या पुढं होतं आणि ते समर्थपणे पेललेलं आहे. गुंतवणूकदार असो, उद्योजक आणि सर्वसामान्य लोक असो, त्यांच्यात आत्मविश्वास जागवण्याचं शिवधनुष्य आपण पेलून दाखवलं. कृषी, शिक्षण, ऊर्जा, निर्मिती, पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा या क्षेत्रांमध्ये आमुलाग्र क्रांती आपण घडवतोय. दीड कोटी रोजगार निर्माण करण्याचं आपण ठरवलं आहे.***

दरम्यान, नागपूर इथं विभागीय आयुक्त कार्यालयात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ध्वजारोहण केलं. यावेळी स्वातंत्र्यसंग्रामातील सेनानींना त्यांनी अभिवादन केलं.

छत्रपती संभाजीनगर इथं विभागीय आयुक्त कार्यालयात मुख्य ध्वजारोहण सोहळा पार पडला. राज्याचे अल्पसंख्यांक विकास, औकाफ आणि पणन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

याप्रसंगी विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी केलेल्या भाषणात सत्तार म्हणाले –

***मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण आपल्या जिल्ह्यात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आपल्या जिल्ह्यात ५ लाख ३२ हजार ७६९ इतक्या बहिणींचे नाव या याजनेच्या नावासाठी मंजूर झाले असून राज्यात आपला जिल्हा हा सर्वत्र अग्रेसर आहे. छत्रपती संभाजीनगर इथे अल्पसंख्याक आयुक्तालयाची स्थापना करून कार्यान्वित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे अल्पसंख्याक समाजाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासाला चालना मिळणार आहे. परवा झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मराठवाड्याचा हिताचे निर्णय घेतले आहेत.***

दरम्यान, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉक्टर विजय फुलारी यांनी ध्वजारोहण केलं तर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात प्रशासकीय न्यायमूर्ती रविंद्र घुगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.
जालना इथं जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते झालं. यावेळी पालकमंत्र्यांनी जिल्हावासियांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.
बीड इथं राज्याचे कृषी मंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते.
नांदेड इथं जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं, तर स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात कुलगुरू डॉक्टर मनोहर चासकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं.
लातूर इथं जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आलं. याप्रसंगी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ पार पडला. त्यावेळी जिल्हाधिकारी परदेशी यांनी उपस्थितांना भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

परभणी इथं मुख्य शासकीय ध्वजरोहणाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते पार पडला. दरम्यान, वसंतराव नाईक कृषिविद्यापीठात कुलगुरू डॉक्टर इंद्रमणी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

धाराशिव इथं मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा राज्याचे आरोग्यमंत्री तथा धाराशिव चे पालकमंत्री प्राध्यापक डॉक्टर तानाजी सावंत यांच्या हस्ते पार पडला.

****

राष्ट्रीय पात्रता चाचणी संस्थेनं यंदाच्या यूजीसी नेट परीक्षेचं नवं वेळापत्रक जाहीर केलं असून २६ आणि २७ ऑगस्ट रोजी होणारे पेपर अन्य तारखांना होतील असं असल्याचं म्हटलं आहे. अन्य वेळापत्रकात मात्र कोणताही बदल केलेला नसल्याचं या संस्थेनं स्पष्ट केलं आहे.

****